निवासी आयुक्त व सचिव कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या कार्यालयाकरिता वाहन क्र.MH-०१-AN-२१०२ (Bullet Proof), MH-०१-AN-२३६६ व MH-०१-AN-२३६७ ही ०३ वाहने निर्लेखित करण्यास व त्याऐवजी ०३ नवीन वाहने (त्यापैकी ०१ बुलेट प्रुफ वाहन मा.मुख्यमंत्री महोदयांकरिता) खरेदी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- सदन-२०२५/प्र.क्र.७२/राजभ**

मंत्रालय (मुख्य इमारत), ३ रा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगरु चौक, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : ०८ मे, २०२६**

<u>वाचा</u>
(१) निवासी आयुक्त, आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र . निआ/ व्यमस/वाहन निर्लेखन/२०२०/१४४-अ/५६९०, दि.३०/०६/२०२५
(२) शासनाचे समक्रमांकाचे दि.०२/०७/२०२५ रोजीचे पत्र
(३) सहायक निवासी आयुक्त (रा.व सु.), महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.निआ/व्यमस/वाहन निर्लेखन/२०२०/१४४-अ/५७०६, दि.०३/०६/२०२५
(४) शासनाचे समक्रमांकाचे दि.०४/०९/२०२५ रोजीचे पत्र
(५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन-२०२५/प्र.क्र.१९/विनियम, दि.१७/०९/२०२५.
(६) सहायक निवासी आयुक्त (राजशिष्टाचार), निवासी आयुक्त व सचिव यांचे कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.निआ/व्यमस/वाहन निर्लेखन (१४४अ) /२०२५,दि.०२/१२/२०२५
(७) निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन यांचे पत्र क्र.निआ/व्यमस/वाहन निर्लेखन (१४४-अ)/२०२५/६१६, दि.६/५/२०२६

**<u>प्रस्तावना :-</u>**

निवासी आयुक्त व सचिव यांचे कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या कार्यालयाकडील वाहन क्र.MH-०१-AN-२१०२ (Bullet Proof), MH-०१-AN-२३६६ व MH-०१-AN-२३६७ ही ०३ वाहने निर्लेखित करणे व त्याऐवजी ०३ नवीन वाहने (त्यापैकी ०१ बुलेट प्रुफ मा.मुख्यमंत्री महोदयांकरिता) खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली कार्यालयाकडील वाहनांपैकी क्र.MH-०१-AN-२१०२ (Bullet Proof), MH-०१-AN-२३६६ व MH-०१-AN-२३६७ ही ०३ वाहने निर्लेखित करण्यास व त्याऐवजी ०३ नवीन वाहने (त्यापैकी ०१ बुलेट प्रुफ मा.मुख्यमंत्री महोदयांकरिता) खरेदी करण्यास **खालील अटींच्या अधीन राहून तसेच संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णय दि.१७.९.२०२५ अन्वये विहीत वाहन किंमत मर्यादा धोरणातील तरतुदींस अनुसरून** मान्यता देण्यात येत आहे.

(१) निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली कार्यालयातील MH-०१-AN-२१०२ (Bullet Proof), MH-०१-AN-२३६६ व MH-०१-AN-२३६७ ही तीनही वाहने शासकीय परिवहन सेवा यांचेमार्फत निर्लेखित केल्याचे आदेश वित्त विभागास उपलब्ध करुन देण्यात यावेत.

(२) प्रस्तावित ०३ नवीन वाहने वित्त विभाग शासन निर्णय दि.२ फेब्रुवारी, २०२४ च्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीने व अनुज्ञेय किंमत मर्यादेत खरेदी करण्यात यावीत. तसेच यासाठी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-२.अ.क्र.१९ (ब) नियम ६९ मधील नमूद अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

(३) वाहन खरेदीची कार्यवाही उद्योग उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ अन्वये विहित शासकीय खरेदी धोरणानुसार तसेच त्यामध्ये वेळावेळी केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने करण्यात यावी.

(४) सदर वाहने खरेदीस मान्यता दिल्यानंतर आवश्यक निधी विहित कार्यपध्दतीने विहित लेखाशीर्षाखाली उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. उपरोक्त नमूद वाहन खरेदीसाठी होणारा खर्च “मागणी क्र.ए-०४, मुख्य लेखाशीर्ष-२०५२ सचिवालय-सर्वसाधारण सेवा, ०९२(४)-निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, संगणक संकेतांक-२०५२०१२३, ५१-मोटार वाहने” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. तसेच मा.मुख्यमंत्री यांच्याकरिता घेण्यात येणाऱ्या वाहनास बुलेटप्रुफींग करण्यासाठीचा खर्च त्याच लेखाशिर्षांतर्गत (२०५२०१२३) १३-कार्यालयीन खर्च या उद्दीष्टाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/विनियम, भाग-दोन, दि.१७.०४.२०१५ मधील भाग-पहिला, उपविभाग-दोन अ.क्र.१९-ब व नियम क्र.६९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व संबंधित अटी व शर्तीच्या अधिन राहून **तसेच** संदर्भ क्र.५ येथील दि.१७/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.५ च्या अनुषंगाने आणि वित्त विभाग/व्यय-४ च्या अनौपचारीक संदर्भ क्र.७४३/व्यय-४, दि.१८/१२/२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५०८१६०१४२१६०७ असा आहे सदर शासन .निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RANSING ANANDRAO DERE
Date: 2026.05.08 16:02:51 +05'30'

**( रणसिंग डेरे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
२) निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली.
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व परीक्षा) महाराष्ट्र, १०१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-२०
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
६) कक्ष अधिकारी अर्थसंकल्प कक्ष, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-४/विनियम), मंत्रालय, मुंबई
८) निवडनस्ती (राजभ).